# प्रकरण - 2 (पुस्तिका - 1)
## संस्थेची संरचना, कामे व कर्तव्याबाबतचा तपशील

2.1 लोकप्राधिकरणाची उद्दिष्टे व हेतू :-

नवीन जलस्त्रोताबाबतची कामे, नवीन जलवाहिन्या टाकणे, त्याकरिता बोगदे, भूयारे इ.ची बांधणी सेवाजलाशयासह अधिकाधीक पाणी आणून त्याच्या समान वितरणाकरिता टाकण्यात येणाऱ्या जलवाहिन्या, नवीन उदंचन केंद्रे, जलप्रक्रिया केंद्रे, जलशुद्धिकरण प्रक्रिया केंद्रे इ.च्या बांधणी, पुनर्बांधणीच्या तसेच त्यासंबंधीत सर्व कामांसाठी आवश्यक असणारे यांत्रिकी व विद्युत घटकांबाबतचे नियोजन व बांधणी उभारणी करणे.

2.2 विशेष कार्य / कल्पना (नियोजन) :-

मुंबई शहराच्या विविध मोठ्या भागांना सर्वोच्च प्रतीच्या पिण्याच्या स्वच्छ पाणी पुरवठ्यात समान प्रमाणात वाटप होण्यासाठी वृद्धी करणे.

2.3 इतिहास व माहितीचा संदर्भ :-

मुंबई शहर व उपनगरांचा जसा विस्तार होऊ लागला  तसा पाण्याचा अतिरिक्त पुरवठा करण्याकरिता हाती घ्यावयाच्या नवीन पाणी पुरवठा प्रकल्पांसाठी प्रमुख अभियंता (पूर्वीचे नांव प्रकल्प अभियंता) असा वेगळा विभागच स्थापन करण्याची गरज भासली.  या प्रकल्पाच्या कामांमध्ये जलस्त्रोताच्या विकासापासून ते उच्चतम दर्जाचे पाणी शहर, पूर्व आणि पश्चिम उपनगरांमधील जलाशयापर्यंत आणण्याकरिता केंद्र सरकार व राज्य सरकारकडून घ्याव्या लागणा-या विविध मान्यता / मंजूरी, भूसंपादनापासून ते संपूर्ण व्यवस्थेची संकल्प चित्रे तयार करणे इ. गोष्टींचा अंतर्भाव होतो.  सध्याच्या पाणी पुरवठा प्रकल्पांमध्ये ब-याचशा यांत्रिकी व विद्युत घटकांचा उदा. विद्युत उपकेंद्रे, उदंचन संयंत्रे, हरिनिकरण संयंत्रे, प्रक्रीया संयंत्रे विभागातील प्रकाशाची सोय, जलवाहिन्यांमधील झडपा, जोडणीची इतर कामे तसेच संलग्न सेवा जसे उद्वाहन, वातानुकुलन, संपर्क सुविधा इ.चा समावेश आहे.

उपप्रमुख अभियंता (पापुप्र) म.वै-2 यांचा विभाग खात्यातील कर्मचारी अधिकारी किंवा प्रकल्प सल्लागार यांच्या सहकार्याने वरील कामांचे नियोजन करून ती कामे प्रत्यक्ष पार पाडतात.

2.4 कर्तव्ये :-

नियोजन, संकल्पचित्रे, अंदाज, निविदेबाबतची कागदपत्रे, निविदा मागविणे, कागदपत्रांची छाननी, प्रत्यक्ष कार्यादेश देणे, खाते व बाहेरील संस्था उदा.विद्युतपुरवठा मंडळ, महामार्ग प्राधिकरण, एमटीएनएल, कारखाने निरीक्षक, विद्युत निरीक्षक इ.चा समन्वय साधणे, कंत्राट शर्तीनुसार सदर कामे नियत वेळेत पूर्ण करणे व  कंत्राट शर्तीनुसार नमूद केलेल्या प्रतीचे काम पूर्ण करणे हे या विभागातील कर्मचा-यांचे मुख्य कर्तव्य आहे.  तसेच कामाच्या प्रगतीबाबतची व पूर्ण झालेल्या कामांची कागदपत्रे जतन करणे व त्याबाबतचे मासिक/त्रैमासिक अहवाल सादर करणे हे ही सदर कर्मचा-यांचे कर्तव्य आहे.

2.5 मुख्य कामे / कार्ये :-

प्रमाणभूत दर्जाचे पाणीपुरवठा संबंधित विविध प्रकल्प टप्प्या टप्प्याने राबविणे.

2.6 <u>पुरविण्यात येणा-या सेवांची यादी :</u>

**<u>चालू कामे</u>** <u>–उप प्रमुख अभियंता(पा.पु.प्र.) म.वै.-2</u>

1. भांडुप अँकर ब्लॉक ते मरोशी अँकर ब्लॉक दरम्यान अस्तित्वात असलेल्या दोन 1800 मि.मी. व्यासाच्या तानसा (पुर्व व पश्चिम) जलवाहिन्या बदलुन 2400मि.मी. व्यासाची एक जलवाहिनी टाकणे.

   भाग अ - भांडुप अँकर ब्लॉक ते आयआयटी पवई युसीआर वॉल.

2. भांडुप अँकर ब्लॉक ते मरोशी अँकर ब्लॉक दरम्यान अस्तित्वात असलेल्या दोन 1800 मि.मी. व्यासाच्या तानसा (पुर्व व पश्चिम) जलवाहिन्या बदलुन 2400मि.मी. व्यासाची एक जलवाहिनी टाकणे.

1) भाग ब - आयआयटी पवई युसीआर वॉल ते पवई अँकर ब्लॉक.

3. भांडुप अँकर ब्लॉक ते मरोशी अँकर ब्लॉक दरम्यान अस्तित्वात असलेल्या दोन 1800 मि.मी. व्यासाच्या तानसा (पुर्व व पश्चिम) जलवाहिन्या बदलुन 2400मि.मी. व्यासाची एक जलवाहिनी टाकणे.

2) भाग क - पवई अँकर ब्लॉक ते मरोशी गेट

4. हेडगेवार उदयान (अमर महाल) पासुन ट्राम्बे निम्नस्तर जलाशय आणि पूढे ट्राम्बे उच्चस्तर जलाशयापर्यंत जलबोगदा बांधणे.

5. येवई पांजरापूर येथील महासंतुलन जलाशयाची संरचनात्मक दुरुस्ती.

6. पिसे (भिवंडी) येथे नविन बंधा-याचे विस्तृत अभियांत्रिकी विश्लेषणासह अस्तित्वात असलेल्या बंधा-याचे स्थिती विश्लेषण व संरचनात्मक लेखपरिक्षाणासाठी सल्लागार सेवा.

7. ठाणे भिवंडी येथील पांजरापूर जलपक्रिया केंद्रासाठी नविन हरीणीकरण संपर्क टाकीचे बांधकामकरण्यासाठी सल्लागार सेवा.

8. पिसे-पांजरापूर येथील मुंबई महानगरपालिकेच्या मुख्य जलवाहिनीच्या सेवा रस्त्यावरील प्रेषण जलवाहिनी पियर PA-61, पिसे या ठिकाणी असलेल्या पुलाचे दुरुस्तीचे काम.

9. अस्तित्वात असलेल्या (२-१४५० मि.मी. व्यासाच्या) तानसा जलवाहिनीऐवजी मरोशी ते सहार गावापर्यंत २००० मि.मी. व्यासाची एक जलवाहिनी टाकणे.

**<u>नियोजित कामे-</u>** <u>उप प्रमुख अभियंता(पा.पु.प्र.) म.वै.-2</u>

पिसे पांजरापूर संकुल येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील मुख्य जलवाहिन्यांच्या सेवा रस्त्यालगत अस्तित्वात असलेले जुने दगडी पूल व मो-या पाडुन पुनर्बांधणी करण्याचे काम.

**2.7** संरचनात्मक तक्ता :-**उप-प्रमुख अभियंता मध्य वैतरणा -2**

| | |
|---|---|
| उप-प्रमुख अभियंता (पापुप्र) मवै-2(प्र.)- | 1 |
| कार्यकारी अभियंता (पा.पु.प्र.) म.वै.-2(प्र.)- | 1 |
| सहाय्यक अभियंता- | 5 |
| दुय्यम अभियंता- | 10 |
| कनिष्ठ अभियंता- | 3 |
| मुख्य लिपिक - | रिक्त |
| लिपिक- | 1 |
| वरिष्ठ लघुलेखक-<br>टंकलेखक- | रिक्त रिक्त |
| शिपाई-<br>मुकादम-<br>कामगार- | रिक्त<br>1, 1रिक्त<br>2 |

**2.8** जनतेकडून अपेक्षा :-

सदर कामे पार पाडताना होणा-या गैरसोयी सहन करुन सहकार्य करणे.

**2.9** जनतेच्या सहभागाच्या योजना :-

याकरीता कोणतीही वेगळी योजना नसली तरीही नागरीकांना सदर प्रकल्प कामांना भेटी द्यावयाच्या असल्यास त्याकरीता त्यांच्या खर्चाने योग्य परवानगीसह भेटींचे आयोजन करता येईल (कामाच्या ठिकाणचे छायाचित्रण टाळून).

**2.10** सेवा पुरविण्याची संरचना व जनतेच्या तक्रारी :-

हि बाब प्रकल्पकामांबाबत लागू होत नाही. तरीही नागरीकांच्या काही तक्रारी असल्यास निर्देशित अधिकारी त्याबाबत लक्षपूर्वक ऐकून त्यावर उत्तर देतील.

सही-

**उप प्रमुख अभियंता**

**(पा.पु.प्र) मध्य वैतरणा -2**